मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | मंगळवार, दि. 21 मे 2024 | पान- 1

# महापालिकेची अनधिकृत होर्डिंगवर कारवाई सुरु

## दोन दिवसात होर्डिंग काढण्याचे आवाहन : फलक धारकाने संरचनात्मक लेखापरिक्षण प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात विविध ठिकाणी महापालिकेची परवानगी न घेता होर्डिंग्स किंवा जाहिरात फलक उभारण्यात येत आहेत. यामुळे शहराचे विद्रुपीकरण होत असून होर्डिंग कोसळून जिवित किंवा वित्त हानी होण्याच्या घटना घडत आहेत. त्यामुळे महापालिकेने अनधिकृत होर्डिंगवर सोमवार पासून कारवाईला सुरुवात केली आहे.




पिंपरी-चिंचवड शहरातील होर्डिंग्सबाबत महापालिका अधिकारी, जाहिरात फलक धारक यांच्यासमवेत शुक्रवारी (दि.17) बैठक झाली होती. त्यावेळी दोन दिवसात होर्डिंग काढण्याचे आवाहन करण्यात आले होते. पावसाच्या सुरूवातीस येणाऱ्या वादळ, वाऱ्यामुळे कुजलेली, गंजलेली, कमकुवत अशा प्रकारच्या जाहिरात फलकांचे स्ट्रक्चर पडून जिवीतहानी किंवा वित्तहानी होण्याच्या घटना घडण्याची शक्यता असते. शहरातील सर्व जाहिरात फलक धारकांनी आपला परवाना दरवर्षी नूतनीकरण करणे आवश्यक आहे.

दरवर्षी 31 मार्चपर्यंत विहीत वेळेत फलक धारकांनी परवान्याचे नूतनीकरण केले नसेल तर त्यांचा परवान्याचे नूतनीकरण केले जाणार नाही. तसेच प्रत्येक फलक धारकाने संरचनात्मक लेखापरिक्षण प्रमाणपत्र (स्ट्रक्चरल ऑडिट सर्टिफिकेट) सादर करणे बंधनकारक आहे.

जे होर्डिंग धारक प्रमाणपत्र सादर करणार नाहीत त्यांचा परवाना रद्द केला जाईल. तसेच होर्डिंग उभारण्यात आलेल्या जागेवर संरचना अभियंत्याने पाहणी करूनच संरचनात्मक लेखापरिक्षण प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात यावे तसेच जाहिरात फलकाची संरचना गंजू नये किंवा कमकुवत होऊ नये यासाठी संरचना पेंटींग करणे बंधनकारक असणार आहे, अशा सूचना आयुक्त सिंह यांनी दिल्या होत्या.

सर्वेक्षणात 24 अनधिकृत होर्डिंग आढळले आहेत. या होर्डिंग धारकांना होर्डिंग हटविण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. काहींनी होर्डिंग काढले नसल्याने कारवाई सुरु केली आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील सहा प्रभागात 1 हजार 136 होर्डिंग आहेत. यापैकी 918 होर्डिंग्जधारकांनी रितसर परवानगी घेतली आहे. तर 218 जणांनी नवीन आर्थिक वर्षात अद्याप परवानगी घेतली नसल्याची बाब समोर आली आहे.

**कोणत्या प्रभागात किती होर्डिंग**

| प्रभाग | संख्या |
|---|---|
| अ | 256 |
| ब | 378 |
| क | 81 |
| ड | 182 |
| इ | 177 |
| फ | 62 |
| एकूण – | 1136 |

# दहा लाखांचे 70 मोबाईल हस्तगत; दरोडा विरोधी पथकाची कामगिरी

## 10 लाख 14 हजार 700 रुपयांचे 70 स्मार्ट फोन हस्तगत : हस्तगत केलेले मोबाइल मूळ मालकांना प्रदान

**पिंपरी | प्रतिनिधी**

गहाळ झालेल्या मोबाईल फोनच्या तक्रारींची माहिती संकलित केली. त्यातील ॲक्टिव्ह झालेले १० लाख १४ हजार ७०० रुपयांचे ७० स्मार्ट फोन पोलिसांनी हस्तगत केले. पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या दरोडा विरोधी पथकाने ही कारवाई केली.

गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, २०२३ व मार्च २०२४ या कालावधीत मोबाईल फोन गहाळ झाल्याबाबत तक्रारी दाखल झाल्या. त्यानुसार दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ निरीक्षक बाळकृष्ण सावंत यांनी एक पथक तयार केले. या पथकाने गहाळ मोबाईलची माहिती संकलित केली. पोलीस अंमदलार प्रवीण कांबळे तांत्रिक विश्लेषण विभागाचे अंमलदार नागेश माळी व पोपट हुलगे यांच्याकडून गहाळ झालेले जे मोबाईल कार्यान्वित झाले आहेत त्याची माहिती संकलित केली.




दरोडा विरोधी पथकाने कार्यान्वित झालेल्या मोबाईच्या वापरकर्त्यांचे नाव व पत्ते घेऊन १० लाख १४ हजार ७०० रुपये किमतीचे ७० महागडे मोबाईल राज्याच्या विविध भागातून हस्तगत केले. हस्तगत केलेले मोबाइल हे मूळ मालकांना प्रदान करण्यात येणार आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत, सायबर सेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वैभव शिंगारे, सहायक पोलीस निरीक्षक सागर पानमंद, पोलीस उप निरीक्षक भरत गोसावी, पोलीस अंमलदार प्रविण कांबळे, महेश खांडे, औदुंबर रोंगे, उमेश पुलगम, विक्रांत गायकवाड, गणेश हिंगे, आशिष बनकर, राहुल खारगे, नितीन लोखंडे, प्रविण माने, सागर शेडगे, गणेश कोकणे, गणेश सावंत, सुमित देवकर, विनोद वीर, अमर कदम, समीर रासकर, चिंतामण सुपे तसेच तांत्रिक विश्लेषण विभागातील पोलीस हवालदार माळी व पोलीस शिपाई हुलगे यांनी केली आहे.

# बारावीचा निकाल आज जाहीर होणार

## राज्य मंडळाचा निकाल वाढणार की कमी होणार याबाबत उत्सुकता : गेल्यावर्षीचा निकाल 91.25 टक्के

**पुणे | प्रतिनिधी**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) आणि कौन्सिल फॉर द इंडियन स्कूल सर्टिफिकेट (सीआयएससीई) एक्झामिनेशनने (सीआयसीएसई) या शिक्षण मंडळांच्या बारावीच्या परीक्षांचे निकाल नुकतेच जाहीर झाले. त्यामुळे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल कधी लागणार याची उत्सुकता निर्माण झाली आहे. राज्य मंडळाने दिलेल्या माहितीनुसार बारावीच्या परीक्षेचा निकाल आज (२१ मे) जाहीर करण्यात येणार आहे.



यंदा बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २३ मार्चदरम्यान घेण्यात आली. यंदा राज्यातील १५.१३ लाख विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यात विज्ञान शाखेसाठी सर्वाधिक सात लाख ६० हजार ४६ विद्यार्थी, कला शाखेसाठी तीन लाख ८१ हजार ९८२, वाणिज्य शाखेसाठी तीन लाख २९ हजार ९०५, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ३७ हजार २२६, आयटीआयसाठी चार हजार ७५० विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सीबीएसई आणि आयसीएसईच्या बारावीचा निकाल यंदा वाढला आहे. त्यामुळे राज्य मंडळाचा निकाल वाढणार की कमी होणार याबाबत उत्सुकता आहे. गेल्यावर्षी राज्याचा बारावीचा निकाल ९१.२५ टक्के लागला होता.

ऑनलाइन निकालानंतर बारावीची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना स्वतःच्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्याने मिळवलेल्या गुणांची गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांच्या छायाप्रती, पुनर्मूल्यांकनासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन (HTTP://VERIFICATION.MH-HSC.AC.IN) स्वतः किंवा कनिष्ठ महाविद्यालयामार्फत अर्ज करता येणार आहे. गुणपडताळणी आणि उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी २२ मे ते ५ जून या कालावधीत ऑनलाइन अर्ज करता येईल.

उत्तरपत्रिका पुनर्मूल्यांकना साठी ऑनलाइन अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन करण्यासाठी आधा उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य असून छायाप्रत मिळाल्याच्या दिवसापासून कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपद्धतीचा अवलंब करून संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे.

बारावीच्या परीक्षेत सर्व विषयांसह प्रविष्ट होऊन उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लगतच्या दोनच संधी (जुलै-ऑगस्ट २०२४ व फेब्रुवारी-मार्च २०२५) श्रेणीसुधार योजनेअंतर्गत उपलब्ध राहतील.

जुलै-ऑगस्ट २०२४ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या पुरवणी परीक्षेसाठी पुनर्परिक्षार्थी, श्रेणीसुधार विद्यार्थ्यांना २७ मे पासून मंडळाच्या संकेतस्थळावरुन ऑनलाइन अर्ज भरता येईल. त्याबाबतचे परिपत्रक स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

### 'या' वेबसाईटवर पाहा निकाल

» राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे निकाल मंगळवारी जाहीर होणार असल्याची घोषणा केली. विद्यार्थ्यांना दुपारी एक वाजल्यापासून निकाल ऑनलाइन पाहता येणार आहे. तसेच निकालाची प्रिंट घेता येणार आहे. विद्यार्थ्यांना दरवर्षीप्रमाणे mahahsscboard.in, mahresult.nic.in या संकेतस्थळावरून निकाल पाहता येणार आहे.

# पुणेकरांना डोक्यावरुन हंडा घेवून पाणी आणण्याची वेळ

## खडकवासला धरणसाखळीत अवघा साडेसहा टीएमसी पाणीसाठा : महापालिकेकडून जूनच्या पहिल्या आठवड्यात फेरआढावा

**पुणे | प्रतिनिधी**

विद्युत केबल जळाल्यामुळे पर्वती पंपिंग केंद्र बंद पडले होते. त्यामुळे या जलकेंद्रांवर अवलंबून असलेल्या संपूर्ण दक्षिण पुण्याचा भागातील पाणीपुरवठा विस्कळीत झाला. आंघोळीसाठी देखील पाणी शिल्लक राहिले नसल्यामुळे अनेक नागरिकांवर पद्मावती येथील पाण्याच्या टाकीवरुन डोक्यावर हंडे भरून आणण्याची वेळी आली. या प्रकारामुळे या भागात जुन्या आठवणींना उजाळा मिळाला असल्याची चांगलीच चर्चा रंगली.



पर्वती जलकेंद्रातून दक्षिण पुण्याला पाणीपुरवठा केला जातो. विद्युत पुरवठा खंडीत झाल्याने तळजाई वसाहत, तळजाई परिसर, संभाजी नगर, चव्हाण नगर, तिरुपती नगर आदी भागातील नागरिकांना पाण्यासाठी वणवण करण्याची वेळ आली. विद्युत पुरवठा गायब झाल्याने

तळजाई गोल टाकीवरील तसेच एचएलआर गोल व एचएलआर चौकोनी टाकीवरील भागाचा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला होता. सकाळी ५ वाजता विद्युत केबल जळाली होती. त्यामुळे पर्वत जल केंद्राचा विद्युत पुरवठा बंद होता. त्यामुळे या भागातील पाणीपुरवठा बंद ठेवण्याशिवाय महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे दुसरा पर्याय नव्हता. पाणी नसल्याने अनेक नागरिकांनी पद्मावती येथील पाण्याच्या टाकीवरुन पाण्यासाठी धाव घेतली. १९८६-८७ या काळात या भागातील नागरिकांना डोक्यावर हंडे घेऊन पाणी आणावे लागत होते. या भागात पाण्याचे जाळे पसरले, घरोघरी नळ कालांतराने आले. त्यामुळे कोणी डोक्यावरुन हंडा घेवून जाताना नजरेस पडत नाही. परंतु रविवारी याची पुन्हा प्रचिती आली. काहींनी डोक्यावरून पाणी आणण्याचा आनंद लुटला. तर रविवारची सुट्टी पाण्यासाठी वाया गेली अशी भावना व्यक्त करुन पाणीपुरवठा प्रशासनावर नाराजी व्यक्त केली. असे या भागातील माजी नगरसेवक महेश वाबळे यांनी सीविक मिररला सांगितले. याबाबत महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना संपर्क साधला असता होऊ शकला नाही.

> पर्वती जल केंद्रात काहीना काही बिघाड होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. शहरात पाण्याची टंचाई जाणवत आहे. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. रविवारी सुट्टीच्या दिवशी नागरिकांना पाण्यासाठी बाहेर पडावे लागले. आंघोळीसाठी पाणी नसल्याच्या अनेकांनी तक्रारी केल्या. आज दिवसभरात पाण्याचे नियोजन विस्कळीत झाले. संध्याकाळी कमी दाबाने पाणीपुरवठा झाल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागला.
>
> - महेश वाबळे, माजी नगरसेवक, पुणे महापालिका.

# प्रसिद्ध व्यावसायिक आहेत म्हणून सोडू नका

## अल्पवयीन मुलावर कडक कारवाईची मागणी : आमदार रविंद्र धंगेकर यांचा आक्रमक आंदोलनाचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

बड्या उद्योगपतीच्या अल्पवयीन मुलाने भरधाव कार पळवत दोघांना चिरडल्याची घटना घडली. या भयंकर अपघाताच्या घटनेनंतर सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे. या अल्पवयीन मुलावर कडक कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. याप्रकरणी कॉंग्रेस आमदार रविंद्र धंगेकर यांनी आक्रमक भूमिका घेत आंदोलनाचा इशारा दिला आहे.

हिट अँड रन प्रकरणावरुन कॉंग्रेस नेते, आमदार रविंद्र धंगेकर यांनी आक्रमक भूमिका घेत आंदोलनाचा इशारा दिला आहे. आज सायंकाळी चार वाजता रविंद्र धंगेकर हे येरवडा पोलीस स्टेशनच्या बाहेर आंदोलन करणार आहेत. प्रसिद्ध बांधकाम व्यवसायिक आहेत म्हणून त्यांना सोडून देऊ नये, असे पत्रही रविंद्र धंगेकर यांनी पुणे पोलिसांना लिहिले आहे.

या हिट अँड रन प्रकरणात पोलीस जबाबदार आहेत. याप्रकरणात येरवडा पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची चौकशी करावी अशी मागणी करत पोलिसांकडून कारवाईची अपेक्षा आहे, असेही रविंद्र धंगेकर म्हणालेत.

दरम्यान, अनेक तरुण मद्यप्राशन करुन गाड्या चालवतात पुण्यात रात्री दीड ते दोन वाजेपर्यंत पब व बार उघडे राहत असल्याने अनेक गैरप्रकार घडत आहेत, अपघातही वाढत आहेत. शहरातील आणि बारच्या वेळा बदलून त्या कमी करा,अस पत्र यापूर्वी ही पोलिस प्रशासनाला दिले होते. त्यामुळे पब व बारवर कारवाई करा, अशीही धंगेकर यांची पोलीस प्रशासनाला मागणी आहे.

या प्रकरणात अल्पवयीन मुलाला मद्य देणाऱ्यावर सुद्धा कारवाई केली जाणार आहे. 17 वर्षीय अल्पवयीन तरुणाने बेदरकारपणे गाडी चालवत 2 जणांचा जीव घेतला होता. या अल्पवयीन तरुणाच्या वडिलांवर गुन्हा दाखल होणार असल्याची माहिती पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली आहे. कलम 75 आणि कलम 77 जुवेनाईल जस्टिस ॲक्ट प्रमाणे कारवाई केली जाणार आहे.



### अल्पवयीन मुलाच्या वडिलांवर होणार कारवाई

» ही कार पुण्यातील एका प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिकाची असल्याचं बोललं जातंय. अल्पवयीन मुलाने मद्यधुंद अवस्थेत धडक दिल्यामुळे दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. यामध्ये एका तरुणीसह तरुणाचा समावेश आहे. हा अपघात शनिवारी मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास कल्याणीनगर येथे घडला. या प्रकरणी येरवडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आली असून, आता अल्पवयीन मुलाच्या वडिलांवर देखील गुन्हा दाखल होणार आहे.

### कसा झाला अपघात?

» प्रत्यक्षदर्शींनी माहिती देताना सांगितलं की, पोर्शे कारने भरधाव वेगात दुचाकीवरून जाणाऱ्या तरुण-तरुणीला उडवलं. पोर्शे कारनं धक्का देताच दुचाकीवरील तरुण पुढे असणाऱ्या कारवर आदळला. तर तरुणी हवेत उंच उडाली आणि रस्त्यावर पडली. तरुणीचे डोके रस्त्यावर आपटल्याने रक्तस्राव होऊन जागीच गतप्राण झाली. तर तरुणाचाही मृत्यू झाला. दरम्यान, तरुणी तरुणीला धडक देण्याआधी कार इतर वाहनांना धडक देऊन आल्याचंही प्रत्यक्षदर्शींनी सांगितलं. दुचाकी रस्त्याच्या एका बाजूने जात असताना मागून आलेल्या कारने त्यांना उडवलं. या अपघातानंतर पोर्शे कारमधील एअर बॅग उघडल्या. त्यानंतर कार बाजूला थांबवण्यात आली. कारमध्ये तिघेजण होते अशीही माहिती समोर येत आहे.

# कॉंक्रिटीकरणाच्या राडारोड्याचा एसटी प्रवाशांना अडथळा

## वल्लभनगर स्थानकातील फलाटानजीकचे चित्र : बस पकडण्याच्या धावपळीत अडथळा

**पिंपरी | प्रतिनिधी**

वल्लभनगर एसटी स्थानकाच्या कॉंक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर फलाट व स्थानकादरम्यान मोठ्या सिमेंट ब्लॉक बसविण्याच्या कामाकरिता केलेल्या खोदकामाचा राडारोडा फलाटानजीक ठेवण्यात आला आहे त्यामुळे ऐन गर्दीच्यावेळी बस पकडण्यात प्रवाशांना याचा अडथळा होत असल्याचे चित्र आहे.. या स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना या राडारोड्याचा फटका बसत आहे. ऐन गर्दीच्या हंगामात राडारोडा प्रवाशांच्या बस पकडण्याच्या धावपळीत अडथळा ठरत असल्याचे चित्र आहे.

मुलांच्या शाळांना उन्हाळ्याची सुट्टी लागली असून, लोकसभा निवडणूक संपल्यानंतर गावी जाणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील वल्लभनगर एसटी स्थानकावरून राज्यभरात विविध ठिकाणी बस सोडल्या जात असल्याने याठिकाणी प्रवाशांची मोठी गर्दी पहायला मिळत आहे. तर मेट्रोला जागा उपलब्ध करून देण्याच्या बदल्यात एसटी स्थानकाचे कॉंक्रिटीकरण करुन दिले जात आहे.

मात्र, बसस्थानकातील फलाटावर बस उभय केल्या जाणाऱ्याठिकाणी सिमेंटचे ब्लॉक बसविण्याचे काम हाती घेतले आहे. त्याकरिता कॉंक्रिटीकरणाचा काही भाग खोदण्यात आला आहे. हा राडारोडा फलाटाजवळच टाकण्यात आला आहे. काही महिन्यांपुर्वी या स्थानकाचे निम्मे कॉंक्रिटीकरणाचे काम झाले होते. उर्वरित निम्मे काम बाकी राहिल्याने एसटी बसच्या संचालनात अडथळा निर्माण होत असायचा. आता हे काम पूर्ण करण्यात आले आहे. नुकत्याच झालेल्या पावसामुळे खोदलेल्या रस्त्यावर काही ठिकाणी पाण्याची तळी साचली आहेत. वाहनचालक व पादचाऱ्यांना कसरत करतच ये-जा करावी लागत आहे. वर्दळ लक्षात घेता पुढील कॉंक्रिटीकरणाचे काम जलदगतीने पूर्ण करण्याची गरज होती. वाहनांमुळे ही खडी उडून काही नागरिक जखमी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. पावसाळा तोंडावर आला असून त्यापूर्वी हे काम पूर्ण करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे



### ऐन गर्दीच्यावेळी प्रवाशांना अडथळा

» बसस्थानकातील फलाटावर बस उभय केल्या जाणाऱ्याठिकाणी सिमेंटचे ब्लॉक बसविण्याचे काम हाती घेतले आहे. त्याकरिता कॉंक्रिटीकरणाचा काही भाग खोदण्यात आला आहे. हा राडारोडा फलाटाजवळच टाकण्यात आला आहे. त्यामुळे ऐन गर्दीच्यावेळी बस पकडण्यात प्रवाशांना याचा अडथळा होत असल्याचे चित्र आहे. याबाबत सहाय्यक आगारप्रमुख गणेश रत्नपारखी यांच्याशी संपर्क न होऊ शकल्याने त्यांची प्रतिक्रिया समजू शकली नाही.

# सोहळा महिन्यांवर; पालखी मार्गाची दुरवस्था

## पालखी मार्गासाठी कोट्यवधींचा निधी : बारामती-इंदापूर रस्त्यावर पुलाचे काम संथ गतीने

**पुणे | प्रतिनिधी**

संत तुकाराम महाराज पालखी सोहळा सालाबादप्रमाणे श्रीक्षेत्र पंढरपूरकडे दीड दोन महिन्यांमध्ये प्रस्थत्तन ठेवणार आहे. इंदापूर तालुक्यात तब्बल चार ते पाच मुक्काम या पालखी सोहळ्याचे असतात. केंद्र शासनाने पालखी मार्गासाठी कोट्यवधींचा निधी दिला; मात्र कोठे निधी गिळंकृत करण्यासाठी वाऱ्याच्या वेगाने काम, तर कुठे पालखी सोहळा जवळ येऊन ठेपला तरी पुलाचे काम अर्धवट, अशी स्थिती पालखी मार्गाची इंदापूर तालुक्याचे हद्दीत दिसून येत आहे.

केंद्र सरकारने तिजोरीचा विचार न करता वारकऱ्यांची क्षेत्र पंढरीची वारी करताना गैरसोय होऊ नये. यासाठी लागेल तेवढा निधी पालखी मार्गासाठी दिला. या निधीच्या माध्यमातून पालखी मार्गाचे जे दर्जेदार काम अपेक्षित होते ते काही किलोमीटर अंतर वगळता झालेलं दिसत नाही. त्यामुळे वारकरी संप्रदायातील वारकरी तसेच स्थानिक नागरिक संबंधित कंपनी विरोधात ठेकेदारा विरोधात संताप व्यक्त करत आहेत.

त्यातच भर म्हणून गेल्या अनेक वर्षांपासून हे पालखी मार्गाचे काम सुरू असून देखील इंदापूर तालुक्याच्या हद्दीमधून भवानीनगरपासून सराटी गावापर्यंत जी छोट्या - मोठ्या पुलाची कामे सुरू आहेत. ते अत्यंत संथ गतीने आहेत. त्यामुळे ये जा करणाऱ्या प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो आहे.

इंदापूर शहरापासून हाकेच्या अंतरावर गोखळी परिसरात असलेल्या म्हसोबा मंदिरशेजारी जे पुलाचे काम सुरू आहे, ते कमी वेगाने सुरू आहे. एकतर हा रस्ता ओढ्यातून असल्यामुळे निसरडा आहे. तर बारामतीकडे जाताना चढाचा आहे. त्यामुळे प्रवाशांचे हाल होताना दिसत आहेत. पालखी सोहळा काही दिवसावर येऊन ठेपला असल्याने ज्या दर्जाचे काम होणे आवश्यक आहे. ते काम होऊ शकणार नाही. जागोजागी पालखी मार्गावर दुरुस्त्या राहिल्या आहेत.

वाखरी ते पंढरपूर या रस्त्याचे काम सुरू आहे. त्यामुळे वाहनांना अडचण येणार असल्याने नियोजन करण्याची मागणी करण्यात आली आहे. दुष्काळी परिस्थिती असल्याने सोहळ्यात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याची मागणी या करण्यात आली.



### विसावा वाढविण्याबाबत चर्चा

» पालखी सोहळ्यामध्ये पुण्यात संगमवाडी ते भवानी पेठ तसेच निंबोरे ओढा ते फलटण विमानतळ हे अंतर पायी वाटचालीस जास्त आहे. यामध्ये सुवर्णमध्य काढून पालखी सोहळ्यामध्ये अर्ध्या तासाचा विसावा मिळावा अशी मागणी राजाभाऊ थोरात आणि नामदेव महाराज वासकर यांनी आहे. पण, विसावा वाढविला तर रात्रीच्या समाज आरतीस उशीर होतो, याकडे लक्ष वेधून यासंदर्भात विचार करून नियोजन करण्याची सूचना बैठकीत करण्यात आली.

### वृक्षारोपणचाही फज्जा

» रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवडीसाठी राज्य शासन केंद्र शासन सकारात्मक असताना, सुद्धा पाहिजे त्या प्रमाणात संबंधित पालखी मार्गावर, वृक्षारोपण जपले जात नाही. त्यामुळेही मोठी नाराजी निर्माण झाली आहे. वडापुरी गावच्या लगत पुलाचे काम अर्धवट असल्यामुळे प्रवाशांना मोठा त्रास होत आहे. छोटे मोठे अपघात यामुळे या भागात घडू लागले आहेत. त्यामुळे पालखी मार्गाचे काम करताना सातत्य ठेवणे गरजेचे आहे. वाहन चालकांना जो त्रास होत आहे. त्यावरती मार्ग काढावा अशी ही अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

# उजनी काठावरील बळीराजाचा जीव टांगणीला

## काठावरील गावातील शेतीला पाणी पुरवठा करणारे शेकडो विद्युतपंप बंद


**पुणे | प्रतिनिधी**

उजनी धरणात मायनसमध्ये पाणीसाठा असताना देखील पिण्यासाठी सध्या उजनी धरणातून पाण्याचा विसर्ग सुरु आहे. त्यामुळे उजनी धरनातील पाण्याची पातळी एकदम खालावली आहे. काठावरील गावातील शेतीला पाणी पुरवठा करणारे शेकडो विद्युतपंप बंद पडेल आहेत. कोट्यवधी रुपये खर्च करून काढलेल्या चाऱ्यादेखील बंद पडल्या आहेत. त्यामुळे ऐन पावसाळ्याच्या तोंडावर पिके करपू लागल्याने बळीराजाचा जीव टांगणीला लागला आहे.

लोकसभा निवडणूक संपली. पाण्याचं राजकारण करून नेते मंडळी मोकळे झाले आहेत. आता मात्र निवडणूक काळात आश्वासन देणारे नेते मंडळींना बळीराजाची होत असलेली दयनीय अवस्था पाहायला देखील वेळ नाही. आता बळीराजा पाण्यासाठी रोज मरणयातना सहन करतं आहे. वर्षभर रक्ताचं पाणी करून जगवलेली पिकं आता ऐन पावसाळा तोंडावर आला असताना सोडून देणं शक्य नाही.

यासाठी बळीराजा एक दोन तास तरी आपला विद्युतपंप चालेल या आशेवर दिवस दिवस धडपडत नदीकाठावर घालवत आहे. काही शेतकऱ्यांनी दोन तीन विद्युतपंप जोडून शेतात पाणी नेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे नदी काठावर नुसते पाईप व केबलचे जाळेच पसरलेलं पाहावयास मिळत आहे. सध्या कोट्यवधी रुपये खर्च करून नदीपात्रात काढलेल्या चाऱ्यांना देखील नदीची पाणीपातळी खूप कमी झाल्याने पाणी येत नाही. नदी पात्रातील अनेक चाऱ्या आता मोकळ्या पडल्या आहेत.

त्यामुळे पाण्यासाठी धडपड करणारा बळीराजा मात्र जसे पाणी कमी होईल तसे पाइप, केबल वाढवून शेतात पाणी नेण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहे. यामध्ये लाखो रुपयांचा खर्च करण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे. शिवाय पाईप वाढवूनही फारसा फायदा होत नसल्याचं चित्र आहे. नदी पात्रात पाणी कमी आणि गाळच अधिक असल्याने अगदी जीवावर उदार होऊन नदी पात्रात पाईप टाकावा लागत आहे. एक फूट पाण्याच्या ठिकाणी आठ ते दहा फूट गाळ असल्याने बळीराज्याचा जीविताला मोठा धोका निर्माण झाला आहे.



### आणखी किती पिढ्यांना संघर्ष

» बळीराजाचा हा संघर्ष संपणार तरी कधी का, आमच्या येणाऱ्या सर्व पिढ्यांना हाच संघर्ष करावा लागतो की काय, असा प्रश्न उजनी काठावरील शेतकऱ्याला पडला आहे. नदीतील पाणीसाठा कमी झाल्याने उजनी धरणावर आधारित अनेक गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या पाणीयोजना देखील बंद पडल्या आहेत. धरण शेजारी असून देखील गावात पिण्यासाठी टँकर मागवण्याची वेळ अनेक गावावर आली आहे. त्यामुळे उजनीच्या पाण्याचं योग्य नियोजन हाच या सर्वांवर एकमात्र उपाय असल्याचं शेतकरी सांगत आहे.